Estd: 1962
'A++' Accredited
by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मार्च/एप्रिल-२०२२ उन्हाळी सत्रातील MCQ पध्दतीने OMR Sheets द्वारे होणा-या ऑफलाईन परीक्षेबाबतच्या मार्गदर्शक सूचना -

- परीक्षा केंद्रावरील ब्लॉकवर ओ.एम.आर. शीटस् वितरीत करताना शिटस् व्यवस्थितपणे छपाई झाली असल्याची खातरजमा करून प्रत्येक परीक्षार्थीस एक याप्रमाणे **ओ.एम.आर. शीटस्वरील छापील नंबरनुसार क्रमवारच वितरीत कराव्यात**. याबाबत सर्व पर्यवेक्षकांना सुचना देण्यात याव्यात.
- ओ.एम.आर. शीटस्वरील माहिती भरण्यासाठी **काळया शाईच्या बॉलपेनचाच** वापर करण्याबाबत परीक्षार्थीना सुचना देण्यात याव्यात.
- ओ.एम.आर. शीटसूला घडी पडणार नाही अथवा ती चुरगळणार नाही किंवा कोणताही डाग पडणार नाही याची दक्षता घेणेबाबत सर्व संबंधितांना सुचना देण्यात याव्यात.
- ओ.एम.आर. शीटस्वरील **Subject Code, Seat No., PRN No.(10 Digit/16 Digit), Exam Name, Subject Name, Name of Center, Subject Code, Question Paper Code, Exam Day & Date & Signature of Student** इत्यादी नोंदी बिनचूकपणे **काळया शाईच्या बॉलपेनद्वारे** नमुद करणेबाबत परीक्षार्थींना सूचना द्याव्यात व **सदरच्या नोंदी व्यवस्थितपणे भरलेची खात्री झालेनंतरच कनिष्ठ पर्यवेक्षकांनी सही करावी.** याबाबत संबंधित कनिष्ठ पर्यवेक्षकांना सुचना द्याव्यात.
- परीक्षार्थींनी प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी दिलेल्या क्रमांकासमोरील एक वर्तुळ काळया बॉलपेनचा वापर करून भरण्याचे आहेत. **कोणत्याही परीस्थितीत पेन्सिल, शाईपेन, मार्कर, जेलपेन इ. वापर करू नये.** याबाबत सर्व परीक्षार्थींना योग्य पुर्व सूचना देण्यात याव्यात.
- उत्तरासाठी दिलेले वर्तुळ भरतेवेळी ओ.एम.आर. शीटस् फाटणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेणेबाबत परीक्षार्थीना सूचना देण्यात याव्यात.
- ओ.एम.आर. शीटस् वरील भरावयाचा आवश्यक तो मजकूर व वर्तुळ भरणे या व्यतिरिक्त कोणतेही अन्य लिखाण/मजकूर परीक्षार्थीनी करू नये याबाबत सूचना द्याव्यात. असे आढळल्यास तो प्रमाद समजण्यात येईल.

- **ओ.एम.आर. शीटस वरील पेपर नंबर हा रकाना फक्त बी.एस्सी. अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थीनी भरावयाचा आहे.** अन्य अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थींनी सदर रकाना रिकामा ठेवणेबाबत परीक्षार्थींना सुचना देण्यात याव्यात.
- ओ.एम.आर. शीटस् वितरणाच्या ब्लॉकनुसार बैठक क्रमांक निहाय नोंदी यापुर्वी विद्यापीठाकडून पुरविण्यात आलेल्या स्टेशनरी रिपोर्टद्वारे ठेवण्यात याव्यात. सदर स्टेशनरी रिपार्ट आपणाकडे उपलब्ध नसल्यास शिवाजी विद्यापीठ परीक्षा गोडावून विभागाकडून मागणी करून घेण्यात याव्यात. यासाठी (०२३१) २६०९३४५,२६०९११४ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
- परीक्षा झाल्यानंतर ओ.एम.आर. शीटस् व त्यासोबत उपस्थिती अहवाल **(Supervisor's Report)** व उत्तरपत्रिका स्टेशनरी रिपोर्ट **(Answerbooks Account Form)** अभ्यासक्रमाप्रमाणे विषयनिहाय लखोटयात सिलबंद करून कळविण्यात आलेल्या लॉट तारखेस संबंधित संकलन केंद्रावर विहित नमुना पत्रासोबत दुपारी ४.०० वाजेपर्यंत विद्यापीठ प्रतिनिधीकडे वेळेत जमा करावेत. **ओ.एम.आर. शीटस् विहित दिवशी वेळेत जमा न केल्यास प्रमाद समजून नियमानुसार सक्त कारवाई करण्यात येईल.**
- ओ.एम.आर. शीटस् सिलबंद करताना त्या प्रत्येक विषयासाठी/पेपरसाठी विद्यापीठाकडून पुरविण्यात आलेल्या लखोटयामध्ये स्वतंत्रपणे सिलबंद कराव्यात. एकाच लखोटयामध्ये अनेक विषयांच्या/ पेपरच्या ओ.एम.आर. शीटस् सिलबंद करू नयेत.
- ओ.एम.आर. शीटस् सिलबंद करण्यापूर्वी ओ.एम.आर. शीटवरील व लखोटयावरती लिहिण्यात आलेली विषय, विषय कोड, अभ्यासक्रम इ. माहिती एकच असल्याची खात्री करूनच लखोटा सिलबंद करण्यात यावा.
- ओ.एम.आर. शीटस् जमा करताना आपणास कळविण्यात आलेल्या नमुना पत्राप्रमाणेच जमा करण्यात याव्यात. (उदा. बी.ए.,बी.कॉम.,बी.एस्सी., एम.ए., एम कॉम., एम.एस्सी., बी.बी.ए., बी.सी.ए. परीक्षेसाठी स्वतंत्र तक्ता करावा.)
- ओ.एम.आर. शीटस् सिलबंद करताना ती अभ्यासक्रम निहाय, विषय निहाय, तारीख निहाय एकत्रित करावीत.
- ओ.एम.आर. शीटस् वितरण व लॉटनुसार जमा करतेवेळी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीकडे ओळखपत्र व महाविद्यालयाचे पत्र असणे आवश्यक आहे.
- पेपर झाल्यानंतर संबंधित पेपरला अनुपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती प्रत्येक दिवशी विद्यापीठाच्या संगणक प्रणालीत नोंदवावयाची आहे. यासंदर्भात काही तांत्रिक अडचण आलेस आय.टी.सेल विभाग ०२३१-२६०९३३५ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

- मार्च/एप्रिल, २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेसाठी विद्यापीठाकडून नव्याने छपाई करण्यात आलेल्या व दि.१५/०७/२०२२ रोजी पासून परीक्षा केंद्रांना वितरीत करण्यात आलेल्या ओ.एम.आर. शीटस् (सोबतच्या नमुन्याप्रमाणे) परीक्षार्थींना परीक्षेवेळी द्यावयाच्या आहेत. यापूर्वी आपणाकडे शिल्लक असलेल्या जुन्या ओ.एम.आर. शीटस् कोणत्याही परिस्थितीत उपयोगात आणू नयेत. तसे आढळून आल्यास तो परीक्षा प्रमाद समजून कारवाई करण्यात येईल.
- मार्च/एप्रिल,२०२२ उन्हाळी सत्रामध्ये होणा-या परीक्षांकरीता ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था अन्य महाविद्यालयांमध्ये करण्यात आली आहे, अशा परीक्षा केंद्र नसलेल्या महाविद्यालयांनी ओ.एम.आर. शीटस् घेण्याची आवश्यकता नाही. सबब, सदर महाविद्यालयांनी ओ.एम.आर. शीटस् वितरण व संकलनासाठी येवू नये.
- मार्च/एप्रिल,२०२२ उन्हाळी सत्रामध्ये होणा-या परीक्षांकरीता आपल्या महाविद्यालयामध्ये अन्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची लेखी परीक्षेसाठीची बैठक व्यवस्था केली असल्यास, अशा विद्यार्थ्यांच्या ओ.एम.आर. शीटस् स्वतंत्र पत्राद्वारे, स्वतंत्र लखोटयामध्ये जमा कराव्यात.
- परीक्षा कामकाज पुर्ण झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या ओ.एम.आर. शीटस अंतिम लॉट दिवशी संबंधित संकलन केंद्रावर विद्यापीठ प्रतिनिधीकडे पत्रासह सुपुर्त कराव्यात.

तेव्हा वरील सूचना आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून मार्च/एप्रिल,२०२२ उन्हाळी सत्राच्या ओ.एम.आर. शीटस्द्वारे ऑफलाईन पध्दतीने होणा-या परीक्षेसाठी सहकार्य करावे.

उपकुलसचिव
(पोस्ट एक्झाम)

⇐ नमुना प्रत ⇒

# SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

**OMR ANSWER SHEET**

OMR ANSWER SHEET NO. 24321

## INSTRUCTIONS FOR FILLING THE SHEET :

1. This sheet should not be folded or crushed.
2. Use only BLUE / BLACK ball point pen to fill the circles.
3. Use of PENCIL is strictly prohibited.
4. Circles should be darkened completely and properly.
5. Cutting and erasing on this sheet is not allowed.
6. 10 digit or 16 digit PRN number should be written in the box from left to right only in digits.
7. Do not make any stray marks on the sheet.
8. Do not use marker or white fluid to hide the mark.

CORRECT METHOD: Ⓐ Ⓑ Ⓒ ● WRONG METHOD: ⊗ ⊙ ⊘ ☑

## ओ. एम. आर. शीट संदर्भात महत्त्वपूर्ण सूचना :

१. शीटवरील माहिती भरण्यासाठी निळ्या / काळा रंगाच्या शाईच्या बॉलपेनचाच वापर करावा.
२. शाईपेन / पेन्सिल / मार्कर इ. चा वापर करू नये.
३. शीटला घडी पडू देऊ नये अथवा चुरगळणार नाही याची दक्षता घ्यावी.
४. एका प्रश्नाच्या उत्तरासाठी केवळ एकच वर्तुळ बॉलपेनने भरावे.
५. एका पेक्षा अधिक वर्तुळ भरले गेल्यास उत्तर चूक धरण्यात येईल.
६. १० अंकी अथवा १६ अंकी पी. आर. एन. (PRN) नंबर चौकटीत डावीकडून उजवीकडे फक्त अंकामध्ये लिहावा.
७. उत्तर पत्रिकेवर कोणत्याही प्रकारच्या खुणा करू नये.
८. उत्तर नोंदविण्याचे वर्तुळ अर्धे न भरता पूर्ण भरावे.

योग्य पद्धत: Ⓐ Ⓑ Ⓒ ● अयोग्य पद्धत: ⊗ ⊙ ⊘ ☑

| SUBJECT CODE | SEAT NUMBER | PRN NUMBER |
|---|---|---|
| 65333 | 14750 | 2021079115 |

(PRN No. Start from here)

Paper No. (Only for B.Sc.)

याठिकाणी परीक्षार्थीनी स्वाक्षरी करावी.

SIGNATURE OF STUDENT

कनिष्ठ पर्यवेक्षकांनी सर्व नोंदी पडताळणी करून स्वाक्षरी करावी.

SIGNATURE OF SUPERVISOR

Exam Name : B.A.-III (Sem V) Subject Name : English

Name of Center : Rajaram College Question Paper Code : SF-621

Examination Day : Monday Date of Examination : 25/07/2022

## A N S W E R S

नमुना ⟶

| Q | Ans | Q | Ans | Q | Ans | Q | Ans | Q | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | B | 6 | C | 11 | D | 16 | B | 21 | B |
| 2 | C | 7 | B | 12 | C | 17 | C | 22 | C |
| 3 | C | 8 | C | 13 | D | 18 | D | 23 | D |
| 4 | B | 9 | B | 14 | B | 19 | B | 24 | C |
| 5 | C | 10 | C | 15 | B | 20 | D | 25 | D |

उपरोक्त नमुना पध्दतीने वर्तुळ काळ्या (बॉलपेन) शाईने भरावे.